. ग्रं. सं. ठाणें
काव्य
३५५

१०२८

ग्रं. सं. ठाणें
काव्य
३५५

# पद्य-पुष्पहार.

## भाग २ रा.



सन १९२८.

REFBK-0003695
REFBK-0003695

[कि]मत ६ आणे.

# पद्य-पुष्पहार.

## भाग २ रा.

---

हें पुस्तक

## गजानन गोपाळ जोशी

पेन्शनर स्कूलमास्तर,

यांनीं तयार केलें.

ग्रंथ कर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

सन १९२८.

प्रकाशकः—कविमंडळ, नाशिक.

किंमत ६ आणे.

REFBK-0003695
REFBK-0003695
क्र. ३६९५

हें पुस्तक **भगवंत देवजी वाजे,** डुबेरकर यांनीं सिन्नर येथें आपल्या **हनुमान** छापखान्यांत छापले. व **गजानन गोपाळ जोशी,** यांनी नाशिक येथें प्रसिद्ध केलें.

सा. का.
८८२

# अभिप्राय

पद्यपुष्पहार भाग २ रा. मीं वाचिला, भाषा शुद्ध आहे. कांहीं कविता चांगल्या आहेत, उदाहरणार्थ भाऊबीज, सच्चिदानंदशक्ति वगैरे बऱ्याच ठिकाणीं विचारांचा संकर आहे तो लघु काव्यांत नसावा. वेदांतावर कवीचा भर विशेष आहे. अश्लीलता कोठेंहि नाहीं.

---

अकोला.
१५-१-१७.

रा. ब. वि. मो. महाजनी, एम्. ए.
अकोला.

# प्रस्तावना.

अलीकडे ग्रंथलेखकाहून भिन्न व्यक्तीची प्रस्तावना पुस्तकाला असलीच पाहिजे, अशी एक वहिवाट पडूं पहात आहे. व त्याच वहिवाटीला अनुसरून श्री. जोशी यांनीं मला प्रस्तावना लिहावयास सांगितली असावी असें दिसतें.

यापूर्वी श्री. जोशी यांनीं आपल्या कांहीं काव्यांचा संग्रह "पद्यपुष्पहार भाग १ ला" या नांवानें प्रसिद्ध केला होता व आतां ते या पुस्तकांत आपल्या आणखी कांहीं कविता प्रसिद्ध करीत आहेत. या पुस्तकांतील कठोपनिषदाच्या भाषांतराखेरीस सर्व कविता महाराष्ट्रांतील प्रसिद्ध मासिकांत छापून आल्या आहेत. व हा भाग तयार झाल्यावर सुमारें बारा वर्षांनीं पुस्तकरूपानें वाचकांसमोर येत आहे. मध्यंतरी कै० विष्णु मोरेश्वर महाजनि यांच्यासारख्या मार्मिक व विद्वान् गृहस्थांच्या नजरेखालून या कविता गेल्या व त्यांनीं श्री. जोशी यांस कांहीं उपयुक्त सूचनाही केल्या.

या संग्रहांतील कविता साध्या व जुन्या वळणाच्या आहेत. त्यांत अश्लीलता नाहीं किंवा--स--वगैरे स्त्रीविषयक बाष्कळ कविता किंवा उत्तान शृंगारानें रसरसलेल्या कविता प्रसिद्ध होतात तशाही ह्या नाहींत. या संग्रहांतील भाऊबिजेची ओवाळणी, सच्चिदानंद

शक्ति, सृष्टिविलास व संध्याराग या कविता गोड आहेत. श्री. शारदास्तवन या कवितेंत श्रीशारदेच्या रूपालंकरणाचें वर्णन करतांना, रवि, शशि, तारा, जगांतील अमूल्य रत्नें हीं शारदेचीं लेणीं आहेत, व फळें, पुष्पें, पशुपक्षी वगैरेचें विलास किंवा थोडक्यांत बोलायचें झाल्यास चराचर सृष्टीच्या हालचाली या सर्वांचें कारण श्रीशारदा आहे असें म्हणतांना कवीनें खरोखर फारच अतिशयोक्ति केली आहे; परंतु " वाग्वा इदं सर्वं भूतम् । गायतिच त्रायतेच । " या औपनिषदिक वाक्यावर या कवितेची उभारणी असल्यामुळें व त्याच कल्पनेचा विस्तार या कवितेंत असल्यामुळें तिच्यांतील अतिशयोक्ति क्षम्य आहे, संध्याराग, भाऊबिजेची ओवाळणी, या कवितांत देशभक्तीची छटा आहे. पण राष्ट्रीय कवितांची त्यांत उत्कटता नाहीं; व श्री. जोशी यांच्या कवितांचा देशभक्ति हा विशेष नसावा असें वाटतें. श्री. जोशी यांचा ओढा वेदांताकडे विशेष दिसतो. व वेदांतासारखा रुक्ष व गहन विषय अत्यंत सोप्या भाषेंत मांडण्याची हातोटी श्री. जोशी यांना आहे. हे त्यांच्या उपनिषदांच्या भाषांतरावरून व सच्चिदानंदशक्ति, ज्योतिःसंशोधन, शारदास्तवन या कवितांवरून दिसन येते. या उपरिनिर्दिष्ट तीन लघुकवितांत औपनिषदिक विचार, सहज, सोप्या भाषेंत सुंदर रीतीनें ग्रथित केले आहेत. या पुस्तकाचा दुसरा विशेष म्हणजे याच्या शेवटीं जोडलेलें कठोपनिषदाचें रूपांतर हा होय. उपनिषदे कळायला कठिण, त्यांचा अर्थ पुष्कळ ठिकाणीं टीकेच्या साहाय्यावांचून कळत नाहीं मग श्लोकास श्लोक

ठेवून तो मराठींत आणणें तर फारच दुर्गम तरी पण श्री. जोशी यांनीं कठोपनिषदाच्या प्रत्येक मंत्राबद्दल एक श्लोक असें मराठींत रूपांतर केलें आहे. अर्थात मूळांतील अर्थ अक्षरशः मराठींत आलेला नाहीं, एवढेंच काय, पण कांहीं मंत्रांचा अर्थ भाषांतराशीं विसंगत वाटतो. तरी पण एकंदरीनें बोलावयाचें झाल्यास मूळांतील बहुतेक अभिप्राय भाषांतरांत आला आहे. व कांहीं ठिकाणीं भाषांतर साधें सुंदर झालें असन अर्थ हानि यत्किंचित् सुद्धां झालेली नाहीं. ज्यांना संस्कृत कळत नाहीं किंवा मूळाचा अर्थ टीकेच्या साहाय्यानें समजून घेण्यास सवड नाहीं त्यांच्या दृष्टीन पाहतां श्री. जोशी यांचा उपनिषदांचें भाषांतर करून त्यांतील गूढतत्त्वज्ञान सोप्या मराठींत आणण्याचा उपक्रम स्तुत्य वाटतो. आतांपर्यंत श्री. जोशी यांच्या कवितांतील गुणाकडे अंगुलि निर्देश केला आहे. इतर गुणदोष्यांचें सविस्तर विवेचन करूं लागल्यास रसिक वाचकांचा अपमान होईल. म्हणून सांगगुणदोषपरीक्षणाचें काम रसिकांवरच सोंपवून ही प्रस्तावना पुरी करतों.

नाशिक.
१६–७–२८

भा. ल. पाटणकर, एम्. ए.
प्रोफेसर एच्. पी. टी. कॉलेज.
उपाध्यक्ष वाङ्मयविहार–मंडळ.
नाशिक.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| सच्चिदानंदशक्ति श्लोक. .... | १ |
| सृष्टीविलास श्लोक. .... | २ |
| कै० गोपाल कृष्ण गोखले, श्लोक. .... | ४ |
| संक्रांतीचा हलवा श्लोक. .... | ५ |
| संक्रांतीचा तिळगूळ श्लोक. ( राष्ट्रीय सभा, स्वराज्य ) .... | ७ |
| संक्रांतीचा तिळगूळ श्लोक. .... | ८ |
| गृहिणी श्लोक. .... | १० |
| शारदास्तवन श्लोक. .... | १३ |
| श्री शारदास्तवन श्लोक. ( महाराष्ट्र- साहित्य संमेलन इंदूर.) | १४ |
| ज्योति संशोधन श्लोक. .... | १६ |
| संध्याराग--आर्या .... | १८ |
| पुष्पगीत श्लोक. .... | २१ |
| भाऊबिजेची ओवाळणी श्लोक. .... | २३ |
| कठोपनिषद् श्लोक. .... | २५ |
| स्नेहगीत पद. .... | ४९ |
| सृष्टीचें गणित. ( आर्या ) .... | ५० |
| सृष्टीचें व्याकरण. ( आर्या ) .... | ५२ |
| स्वराज्य श्लोक. .... | ५४ |

क्र. 3६९५

# सच्चिदानंदशक्ति श्लोक.

रमे सतत सृष्टिशीं, तिजहुनी असे वेगळा ।
प्रकाशक तिला खरा, नच पडे तिच्या तो गळां ॥
वसे हृदय मंदिरीं, भ्रमवितो जगन्मंडला ।
अशास नमितों करीं प्रभुवरा जगन्मंगला ॥ १ ॥

करांत सुमनें, शिरीं मदन-मंजरी गोजरी ।
लता उपवनीं, वनीं, पवनीं डोलती सुंदरी ॥
विलास करिती किती तरुवरांसवे रंगती ।
चमत्कृतिमधे अशा कविमनें सदा गुंगती ॥ २ ॥

नभांत दिसती किती घन विचित्र नानापरी ।
धनुष्य धरिती करी, वसति जीव त्या अंतरीं ॥
जलास उदरांत ते धरुनिया त्वरें धावती ।
रसा करिती वर्षुनी, वसुमती, विलासे क्षिती ! ॥ ३ ॥

मनोरथ जसा फिरे, फिरती इंद्रियें त्यापरी ।
असेल अनुकूल ती स्थिति, कृति घडे त्यावरी ॥
मनास जगतास जो फिरवि, साक्षिरूपें सदा ।
अबाधित असे जगीं, नमन हें असो तत्पदा ॥ ४ ॥

कवी, रणधुरंधरा हृदयिं राहुनी गाजवी ।
तसे गलितपर्णही तरुवरी कसें पालवी ॥
मनोहर-सुवासिकांबुज-सुमांस तूं कोमळ ।
म्हणून नमितों पदीं, हरि विभो मनाचा मल ॥ ५ ॥

नभांत रवि तारका–ग्रह सदा क्रमानें फिरे ।
जगत्हृदयमंदिरीं किरण–रूप तेजें शिरे ॥
सदा स्थिरचरांमधे स्थिति गतीस जो चालवी ।
असा रविसमूह जो फिरवि, त्यास वंदी कवी. ॥ ६ ॥

द्विजांतरिं शिरोनिया मधुर–गान गातो जनीं ।
द्रवे रसिक–हार्द हो, मधुर–गान हें ऐकुनी ॥
खरा कवि जगीं असे द्विज–समूह वाटे मला ।
निसर्ग वसतें तिथें, नमि तया जगन्मंगला. ॥ ७ ॥

माता प्रेमें स्वसुत कवळी स्नेहगंगाप्रवाहीं ।
तैशी साध्वी नमि पतिपदां आदरें सर्वदाही ॥
भक्त प्रेमें प्रभु–पद धरी, वीरहा देशभक्ती ।
शुद्ध प्रेमस्थल कवि कथी **सच्चिदानंदशक्ती** ॥ ८ ॥

---

## सृष्टी–विलास श्लोक.

पुष्पें, फळें मधुर सुंदर गंधयुक्त ।
गातात मंजुलरवे खग कंठमुक्त ॥
आलिंगिती तरुपतीस लता सहर्षे ।
उद्यान पाहुनि असें मन कां न हर्षे ! ॥ १ ॥

जेथें सदा मधुर निर्झर वाहतात ।
खेळे तसा पवन मंद सुगंधयुक्त ॥

बालसहीत हरिणी रमतात जेथें ।
धन्या वनस्थलि ! रमे कविचित्त तेथें, ॥ २ ॥

जेथें दिवे रवि–शशी–ग्रहतारकादी ।
रूपें विचित्र धरिती घन नाट्यवादी ? ॥
कोणी धनुष्य धरिती रविच्या समोर ।
विद्युल्लता करिति नृत्य सुवर्णसार. ॥ ३ ॥

जेथें उषा विकसुनी कमलीं विकासे ।
दिग्देवता धरुनि सोज्वल वस्त्र हासे ॥
तारागणादि विधु निष्प्रभ दीन होती ।
तद्देवता रस कविप्रतिभेस देती. ॥ ४ ॥

गुंजारवें भ्रमर गुंग फुलांत झाले ।
आम्रासवे मधुर गान पिकांत आले ॥
वेणूसवे पवन मंजुळ गान गातो ।
वाहात मंद सरितौघहि गात जातो ॥ ५ ॥

चंडोल गायन करी मधु, मोर रावे ।
स्नेहें विचित्र मधुर स्वर गाति भावें ॥
सृष्टी निसर्ग कारि गायन तापहारी ।
त्याला असे यमक, ताल, न तें विकारी ! ॥ ६ ॥

वर्षाऋतूंत हरितांबर धाति त्याली ।
नेसे तसे शरदिं पीत; वसंतकाळीं ॥
घेई मही युवति पल्लव–राग शेला ।
पुष्पें, फळें मधुर देइ सती पतीला ॥ ७ ॥

सौगंध्य चंदन धरी मदन–स्वरूप ।
रत्नें, सुवर्ण–मणि मौक्तिक कांतिरूप ॥
माधुर्य षड्रस, तशी मृदुता मृणालीं ।
रूपें विचित्र नटली महि भाग्यशाली. ॥ ८ ॥

नवयुग सन १९१५

---

# कै॰ गोपाल कृष्ण गोखले, श्लोक.

या राष्ट्राचें खचित हरलें तेज हें आज लोकीं ।
केली सेवा, सतत हृदयीं एक निष्ठा विलोकी ॥
स्वार्थत्यागें भरत धरणी गोखलेचित्स्वरूप ।
होती, पाहे हर ! हर ! विभो लोपलें देशरूप ॥ १ ॥

हिंदुस्थान वसे सदैव हृदयीं " यावा पुढें तो कसा ? " ।
चिंता हीच वसे, प्रयत्नहि तसे, तो प्राण गेला कसा ? ॥
नाहीं देह जडस्वरूप लपला, रूपांतरानें वसे ।
आर्यावर्तनिधान तन्निधन हें, झालें कसें हो असे ! ॥ २ ॥

वाग्देवीचें खचित हरलें तेज हें आज काय !
हिंदुस्थाना, नशिब फुटलें, व्यर्थ रे, हाय ! हाय ! ! ॥
गेलें सारें हरपुनि तुझें तेज हें आज लोकीं ।
प्राणी सारें, अग, नग, तसे होति संतप्त शोकीं ॥ ३ ॥

पक्षी शोकें रडत बसती अग्नि निस्तेज होई ।
वायू कुठे, रवि–शशि, नद्या खुंटल्या त्याच ठाई ॥

या शोकानें अशुभ दिसते सृष्टि-देवी, पहा रे ! ।
नेले कैसे हर ! हर ! विभो, प्राण हे आज सारे॥ ४ ॥

ज्ञान केंद्र वळला वरुणाला ।
संपदा भजति तच्चरणाला ॥
शक्ति-भौतिक--कला वसतात ।
पश्चिमेस; वळवा भरतांत ॥ ५ ॥

नाम शेष वसते जगतांत ।
भूमि ही, वसतसे हृदयांत ॥
राष्ट्रशक्ति-सरिता न वाहातें ।
ऐक्य वृष्टि हृदयाद्रिंत होते ॥ ६ ॥

---

## संक्रांतीचा हलवा श्लोक.

तत्त्वज्ञान झरे जिथून निघती, शास्त्रें जिथें नांदती ।
विद्या-काव्य-कला, सरस्वति-रमा प्रेमें जया वंदिती ॥
भूतें एकमतें जयास भजतीं, शस्त्रास्त्रही कांपती ।
ऐसा देश युरोप-खंड करितो संक्रांति युद्धीं किती ॥ १ ॥

रक्तांच्या निघती नद्या, महिवरी-मध्ये[1], नभीं[2] वाहती ।
वीरश्री चमके रणीं, जळतसे द्वेषाग्नि, जाळी किती ! ॥
योद्ध्यांची गति खुंटली, सुमतिही मुत्सद्दि-चित्तांतली ।
क्रांती कोण अशी जगांत घडवी? देवादिकीं व्यापली ॥ २ ॥

---

१ खंदक, २ विमान.

असे जर्मनीच्या मनीं आस खोटी ।
म्हणोनी जगीं क्रांति ही होय मोठी ॥
नृपां नाचवी हालवी सर्व राष्ट्रं ।
मुनीची मनोदेवता कां न कष्टे ! ॥ ३ ॥

राष्ट्राभिमान-सरिता भरतांत वाहे ।
मुंबापुरीस मिळते उदधीस, पाहे ॥
सामाजिकादिक-नद्या मिळती अनेक ।
संक्रांति कार्य करिते धरुनी विवेक ॥ ४ ॥

जाती, धर्म, तसेंच कर्म वगळा, राष्ट्रीय-कार्यें करा ।
ऐसा हा उपदेश थोर करिती, आतां करा साजरा ॥
राष्ट्राच्या वसतात शक्ति भरतीं, त्यांना तुम्ही जागवा ।
संक्रांती करिते स्वकार्य अपलें, तत्पाद सेवा, स्तवा ॥ ५ ॥

हळु हळु बनवी रे, शील-देशाभिमान ।
धवल, मधुर ऐसा शर्करा पाक मान ॥
हलवि हृदय-पात्रीं शुक्ल-सस्नेह-तीळ ।
क्रमि रवि मकराला, द्यावया योग्य काल ॥ ६ ॥

प्रेमोद्यानीं फुलति सुमनें, गंध तीं सोडितात ।
रावे, मैना मधुर वदती चित्तहारी स्वरांत ॥
हर्षे देई तरुवरगळां वेली आलिंगनातें ।
सक्रांतीचा अतुल महिमा वाटतो स्नेहनातें ॥ ७ ॥
आकाशाला क्रमि रवि-शशी, तारका प्रेमभावें ।
क्रांतीसाठीं पवन-सरिता भूवरी नित्य धावे ॥

विद्युद्देवी चमकति घनीं, चेतवी सृष्टि सारी ।
संक्रांतीचे असति असले खेळ नानाप्रकारीं ॥ ८ ॥
नवयुग, तुज देतों तीळ हे गोड पाहे ।
मजवरि तरि ऐसा लोभ हा शुद्ध राहे ॥
नर-हृदयिं वसे जो स्नेह हा नित्य जागो ।
कवि-हृदय-रसानें प्रेपतृष्णाहि भागो ॥ ९ ॥

नवयुग जानेवारी १९१६

---

# संक्रांतीचा तिळगूळ श्लोक.

**( राष्ट्रीय सभा, स्वराज्य. )**

---

संक्रांती भरतांत कार्य करिते ऐक्य-स्वरूपें, पहा ।
मागाया सगळे ‘ स्वराज्य ’ अपलें एकत्र झाले; अहा ! ॥
गेले राक्षस-भेद, सर्व दडले स्वराज्य-सूर्योदयीं ।
ध्यावा हो तिळगूळ गोड, हलवा, स्वातंत्र्य-देवालयीं ॥ १ ॥
गंगा वाहे हिमगिरिवरी स्नेह देई नितांत ।
संपत्तीनें भरत-धरणी रंगली ही जगांत ॥
तैसे पोटीं धरित असते दिव्य-रत्नें अनंत ।
तत्पुत्राला सुखकर असो क्रांति या मंगलांत ॥ २ ॥
विद्या, शास्त्रें, सुरस कविता, वाढलीं शुद्ध रूपें ।
तत्त्व-ज्ञानीं मुनि-मन रमे सच्चिदानंदरूपें ॥

जेथें होती जनक-नृपतीसारखे शूर राजे ।
तत्पुत्रांला सुखकर असो क्रांति ही, जी विराजे ॥ ३ ॥

वीरांचीं सुमनें गुणांत रचुनी स्वाराज्य-माला करीं ।
ही राष्ट्रीय-सभा, नृपांस वरिते, घालून कंठीं करीं ॥
प्रार्थी कीं सुत राजनिष्ठ सगळे साम्राज्यसंघांतरीं ।
क्रांती ही सगळी जनास सुखवो, हे तीळ देतों करीं ॥ ४ ॥

ज्ञानाचा उगवो रवी, तम हरो, तो आर्यवर्ती वसो ।
ऐक्याचे हृदयीं विचार विलसो, तो कार्यरूपें दिसो ॥
येवो गोड फळें सुरम्य तरुला, वीरांतरीं जो रुजे ।
साक्षीभूत ह्मणून अर्पण करीं हे तीळ, यांला भजे ॥ ५ ॥

जावे भेद, जनांत आज दिसती, राष्ट्राचिये कारणें ।
तत्त्वाला हृदयांत ठाव मिळु दे, टाकून देई रणें ॥
झाले थोर मुनी, तयांस नमुनी तत्कार्य हें चालवी ।
त्यांचें स्मारक हें म्हणून तुजला हे तीळ देतो कवी ॥ ६ ॥

# संक्रांतीचा तिळगूळ श्लोक.

Again it is quite true to say of the good man that he does many things for the sake of his friends and of his country, and will, if need do, even die for them.

Aristotle,

धवल-मधुर-पाकीं घालि सस्नेह तीळ ।
सरस-हृदय-पात्रीं; प्रेम हें सांगतील ॥

रवि मकर-वधूला घालितो आज माळ ।
नमन करुनि देतों तीळ, व्हावा सुकाळ ॥ १ ॥

एकीमुळें कारिति निश्चित राष्ट्र-कार्य. ।
येईल काय न तुह्मास, असाल आर्य ! ॥

राष्ट्रोन्नती हृदय-मूर्ति-सतीस गावें ।
ध्यावें अहर्निश; सुधेपरि आळवावें ॥ २ ॥

स्वातंत्र्य-योग-रस कोण न आदरील ।
जाती--मतांतर--पिशाच्च न घालवील ॥
पंचाक्षरी कथिति औषध-तंत्र-मंत्र ।
संक्रांति-तीळ रुचती परि व्हा स्वतंत्र ! ॥ ३ ॥

दे पार्लमेंट भरतास करें सुराज्य ? ।
पोळीवरील मिळतां त्यजि कोण आज्य ! ॥
सांगे तुम्हास इतिहास कराल बेकी ।
होई अजापरि तुम्हास जनांत "बे" कीं ॥ ४ ॥

अध्यात्म-तत्त्व वदतें मज सांग काय ? ।
ख्रिस्ती, महंमद वदे, विभु-निल्ब-काय ॥
"सर्वांवरी सदय-चित्त सदा असावे" ॥
हें सर्व धर्म जनिं मानिति एक-भावें ॥ ५ ॥

ऐसा विरोध न दिसेल मुळांत कांहीं ।
भांडून सत्व हरिलें सगळ्या जनांहीं ॥

जेथें होती जनक-नृपतीसारखे शूर राजे ।
तत्पुत्रांला सुखकर असो क्रांति ही, जी विराजे ॥ ३ ॥
वीरांचीं सुमनें गुणांत रचुनी स्वाराज्य-माला करी ।
ही राष्ट्रीय-सभा, नृपांस वरिते, घालून कंठीं करीं ॥
प्रार्थी कीं सुत राजनिष्ठ सगळे साम्राज्यसंघांतरीं ।
क्रांती ही सगळी जनास सुखवो, हे तीळ देतों करीं ॥ ४ ॥
ज्ञानाचा उगवो रवी, तम हरो, तो आर्यवर्ती वसो ।
ऐक्याचे हृदयीं विचार विलसो, तो कार्यरूपें दिसो ॥
येवो गोड फळें सुरम्य तरुला, वीरांतरीं जो रुजे ।
साक्षीभूत ह्मणून अर्पण करीं हे तीळ, यांला भजे ॥ ५ ॥
जावे भेद, जनांत आज दिसती, राष्ट्राचिये कारणें ।
तत्त्वाला हृदयांत ठाव मिळु दे, टाकून देई रणें ॥
झाले थोर मुनी, तयांस नमुनी तत्कार्य हें चालवी ।
त्यांचें स्मारक हें म्हणून तुजला हे तीळ देतो कवी ॥ ६ ॥

---

# संक्रांतीचा तिळगूळ श्लोक.

Again it is quite true to say of the good man that he does many things for the sake of his friends and of his country, and will, if need do, even die for them.

Aristotle,

धवल-मधुर-पाकीं घालि सस्नेह तीळ ।
सरस-हृदय-पात्रीं; प्रेम हें सांगतील ॥

रवि मकर-वधूला घालितो आज माळ ।
नमन करुनि देतों तीळ, व्हावा सुकाळ ॥ १ ॥

एकीमुळें कारिति निश्चित राष्ट्र-कार्य. ।
येईल काय न तुह्मास, असाल आर्य ! ॥

राष्ट्रोन्नती हृदय-मूर्ति-सतीस गावें ।
ध्यावें अहर्निश; सुधेपरि आळवावें ॥ २ ॥

स्वातंत्र्य-योग-रस कोण न आदरील ।
जाती--मतांतर--पिशाच्च न घालवील ॥
पंचाक्षरी कथिति औषध-तंत्र-मंत्र ।
संक्रांति-तीळ रुचती परि व्हा स्वतंत्र ! ॥ ३ ॥

दे पार्लमेंट भरतास करें सुराज्य ? ।
पोळीवरील मिळतां त्यजि कोण आज्य ! ॥
सांगे तुम्हास इतिहास कराल बेकी ।
होई अजापरि तुम्हास जनांत "बे" कीं ॥ ४ ॥

अध्यात्म-तत्त्व वदतें मज सांग काय ? ।
ख्रिस्ती, महंमद वदे, विभु-नित्य-काय ॥
" सर्वांवरी सदय-चित्त सदा असावे " ॥
हें सर्व धर्म जनिं मानिति एक-भावें ॥ ५ ॥

ऐसा विरोध न दिसेल मुळांत कांहीं ।
भांडून सत्व हरिलें सगळ्या जनांहीं ॥

धर्माभिमान परि व्यर्थ कधीं नसावा ।
संक्रांति ही म्हणुनिया तिळगूळ घ्यावा ॥ ६ ॥
स्वातंत्र्य-देव-चरणास सदा भजावें ।
अद्वैत-तत्त्व-परमेश्वर-राष्ट्र गावें ॥
स्वातंत्र्य-भोग सगळ्या जनतेस द्यावे ।
संक्रांति हीच गमते तिळगूळ घ्यावे ॥ ७ ॥

स्नेहाचे घन हे समाज-शिखरीं वर्षोत वारी सदा ।
उद्यानीं सुमनें प्रफुल्ल दिसती; क्षेत्रीं वसे संपदा, ॥
काव्यें देव-सुधा कवि-द्विज-मुखें सृष्टी पहा गातसे ।
संक्रांतीस करि स्वकार्य रवि हा ज्ञानोदयीं गा, तसे ॥ ८ ॥

---

## गृहिणी श्लोक.

चंद्रिका गगन शोभवी जशी ।
मानसा कमलिनी, सती तशी ॥
भूषवी स्वगृह हार्द[1]-दीपिका ।
सार्थ होय " गृहिणी गृहं " न कां ! ॥ १ ॥

राष्ट्र—बीज वसतें गृहांतरीं ।
मातृ—मानस—पवित्रता वरी ॥
दुग्ध—मिश्रहित पाजिते मुला ।
धन्य माय गृहिणी खरी कुला ! ॥ २ ॥

---

१ प्रेम.

कोल्हापूर



मोह होय पतिच्या मनीं जरी ।
मिष्ट भाषण करी, तया हरी ॥
चित्त होय मृदु–पुष्प संपदीं ।
वज्र कीं कठिण होय आपदीं ॥ ३ ॥

वर्षती जननि–मेघ अंबरीं ।
बुद्धि–नीति शिशुच्या मनावरी ॥
शील–बीज हृदयांत वाढतें ।
मानवी–जग फलास भोगितें ॥ ४ ॥

ज्ञान–केंद्र जगीं मातृ–भूमिका ।
तींत सुज्ञ, कवि जाहले न कां ? ॥
पूर्व–पश्चिम–धरेस पाहतां ।
ज्ञान–कारण ‘ जनी–सुशीलता ’ ॥ ५ ॥

सूर्य हो गृहपती; सुत ग्रह– ।
तारका; विधु पतिव्रता; गृह ॥
स्वर्ग होय; जरि नांदती सुखें. ।
संघ–शक्ति वळवी गृहीं सुखें ॥ ६ ॥

तापसी पुरुष सुज्ञ, शालिनी ।
स्त्री, विचार करि योग्य मानिनी ॥
पाळिती शम–दमांस अंतरी ।
नित्य देव वसतो तया घरीं ॥ ७ ॥

पाझरे अखिल तत्त्व तद्गृहीं ।
वाहती सुरस ओघ या महीं ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ........

शांति--कांति गृहिणी--सखी असे ।
तत्त्व--विद्धृदय रंगतें कसें ! ॥ ८ ॥

माउली मधुर गान गाउनी ।
पाळणा हलवि हार्द दाउनी ॥
बाल--वृत्तिमय माय होतसे ।
स्नेह--मूल गृह, पाहिं तूं कसें ! ॥ ९ ॥

स्थूल--देह जशि वाढवी जनी ।
सूक्ष्म त्यापरिच, पाहिं शोधुनी ॥
कल्पना नविन गुंफिते मनीं ।
शब्द--सृष्टि तशि देइ मागुनी ॥ १० ॥

प्रीति हो सदन--भूंत कीं लता ।
मूळ--बीज " गृहिणी--सुशीलता "
त्यावरी गुरु जलास सिंचिती ॥
त्या सुखास गणुं मंद मी किती ! ॥ ११ ॥

क्रांति होति नव आज या जगीं ।
त्यास हो उगम मातृ--चिल्लगीं ॥
स्नेह- रूप सरितौघ वाहती ।
प्राज्ञ हा सुरस नित्य चाखिती ॥ १२ ॥

विविध-ज्ञान वि. १९१५

## आठवें महाराष्ट्र साहित्यसंमेलन मुंबई, त्यावेळीं केलेलें

# शारदास्तवन श्लोक.

वाग्वा इदं सर्वं भूतं गायतिच त्रायतेच ।

छांदो उप ३-१२-१

वाग्देवी विलसे सदा कवि-हृदीं, सृष्टीस जी शोभवी ।
शास्त्रें, काव्य, कला अनेक धरिते रूपें, पहा, शांभवी ॥
आकाशीं रवि-तारकाग्रहशशी तेजोनिधी गोल हे ।
उद्यानीं सुमनें, सरोरुह वनें, हीं शारदाविग्रहें ॥ १ ॥

रत्नें, पाच, माणि, सुवर्ण चमके तेजें शिरोभूषणीं ।
मुक्ताहार तशीं प्रवाल-पदकें भूपाल-कंठांतुनी ॥
बाजूबंद, कडीं अलंकृति नृपा, शस्त्रास्त्र नानापरी ।
आहे हा सगळा विलास, नटते ही शारदा-सुंदरी ॥ २ ॥

पक्षी मंजुल गोड शब्द करिती, गाती मुदें नाचती ।
प्रेमालिंगन देउनी विहरती, चित्तास आकर्षिती ॥
दांपत्यें रमती, पिलां रमविती सौख्यें जगीं नांदती ।
स्वर्गाचा सगळा विलास जणुं हा, ही शारदा-सत्कृती ! ॥ ३ ॥

पुष्पांचा सुटतो सुवास, रमवी भृंगास जें अंतरीं ।
ठेवी प्रेम—मधास निर्मल—मनें पाटांत, द्यावें तरी ॥
येतें प्रेम फुलांस पाहुनि जनां, हो वीत-रागी जरी ।
स्वर्गाचा सगळा विलास करिते ही शारदा—सुंदरी. ॥ ४ ॥

सिंव्हाचा रव ऐकुनी, भिउनिया हत्ती वनीं धावती ।
जाळ्याभीतारि गुंतल्या हरिणि, त्या दीन-स्वरें भाकिती ! ॥
मुंग्या वारुळ बांधुनी रमति, सत्कार्यी सदा रंगती ।
सृष्टीचा क्रम चालवी नियत हा, श्रीशारदामाय ती ॥ ५ ॥

मेघाचें गगनांत रूप धरुनी चांचल्य दावी जनां ।
पर्जन्यें पडुनी धरेस पिकवी, दे स्फूर्ति जी सज्जनां ॥
नानारूप वसुंधरा धरितसे तन्नाम-सार्थक्य हो ।
लीला या सगळ्या करीत असते ही शारदामाय हो ॥ ६ ॥

ऐसी ही प्रतिभा जगांत नटलीं, काव्यांतरीं वाढली ।
जन्मा ये कविच्या मनांत, रसिकीं जी अंतरी पोषिली ॥
आली आज तुम्हासमोर, नटली जी शब्द-रूपें पहा ।
सेवावी रसिकें स्वकीय दुहिता, वंदी तुम्हा दास हा ॥ ७ ॥

विविध-ज्ञान वि. आक्र १९१५

---

## महाराष्ट्र–साहित्यसंमेलन, इंदूर.

# श्रीशारदास्तवन श्लोक.

" प्रज्ञया वाचं समारुह्य वाचा सर्वाणि नामान्यप्नोति । "

कौषीतकी ब्राह्मण ३--६

सर्वांच्या हृदयांतरांत वसते श्रीशारदा मंगला ।
वागग्नी धरुनी स्वरूप फिरवी, देवी जगन्मंडला ॥

तैशी जी सजते जगीं, विलसते ग्रंथ--स्वरूपें सदा ।
ऐशी दैविकभौतिकें विनटली, वंदी कवी तत्पदा । ॥ १ ॥

'प्रज्ञा' कीं 'प्रतिभा' 'प्रसाद' ह्मणती भिन्नाभिधानें जिला ।
आहे एक, परी जगांत भजती भिन्न--स्वरूपें तिला ॥
वापी, कूप, तडाग भिन्न दिसती भिन्नाकृतीनें जरी ।
आहे एक तयांत तें जल, पहा, प्रज्ञा वसे सुंदरी ॥ २ ॥

गातो कोकिल पंचमीं मधुर जें आम्रांसवें गायन ।
येतां माधव--मास गंध सुटतो चित्तापहारी, वन ॥
तैसा मोर विलास--लास्य करितो, टाहो मुदें फोडतो ।
प्रेमाचा रस पाझरे कवि--हृदीं, पाहून हें रंगतो ॥ ३ ॥

शास्त्रांचे निघतात ओघ जिथुनी, चिन्मानसीं सांचले ।
आयुर्वेद--सरित्प्रवाह निघती, ज्योतिर्विदांचीं मुळें ॥
काव्याचे रस वाहती मधुर हे, भृंगे कवी जाहले ।
तत्त्वांचीं किरणें जिथून निघती, चिच्छक्तिला वंदिलें ॥ ४ ॥

शांतीचें स्थल चंद्रिका दिसतसे लोकांमधे, हें पहा ।
कांती वास करी रवींत सगळी, प्रेमा दिसे कां न हा ? ॥
विद्युत्तेज कसें क्षणांत झळके, कोठून हें पातलें ? ।
चिद्देवी--प्रतिभा जगांत नटली, वंदीं तिचीं पावलें ॥ ५ ॥

स्वर्गंगा धवला भगीरथ--सुता झाली कशी पावन ! ।
आली कोमलता सुवास कमलीं कोठून ? शोधा वन ॥

रत्नाला मिळतो प्रकाश कुठला ? पाषाण आहे जरी ।
नक्षत्रें दिसती सतेज गगनीं; चिच्छक्ति ही साजरी ॥ ६ ॥
वायूला मिळते गती सतत जी, अग्नीसही त्यापरी ।
धावे ही सरिता, मिळे उदधिला, प्रेमें पतीला वरी ॥
वीरश्री तळपे रणांत झळके, वीरांमधे जी वसे ।
देशप्रेम असें अगाध दिसतें; चिच्छक्ति ही कीं असे ॥ ७ ॥
ऐशी ही प्रतिभा मनांत वसते, नाना-स्वरूपें नटे ।
सेवावी कविनें, तशीच रसिकें बुद्धींत, जी पालटे ॥
ग्रंथाचें रचिते, कवि, रसिक जे **साहित्य-संमेलनीं**-- ।
आले आज, कवी तयांस नमितों, हो शारदा तन्मनीं ॥ ८ ॥

अहिल्या--साध्वीचें धवल--यश हंसांस हरिते ।
विचारें आचारें तिजसि सम अन्या न दिसते ॥
“ अहिल्या ” हें नाम-स्मरण करितें पूत कविला ।
तिच्या राज्यीं आलों, नमन करितों तन्नृपतिला ॥ ९ ॥

---

## [1] ज्योति संशोधन श्लोक.

प्रकाशे रवी, चालतें सर्व काम ।
द्विजांचीं कुळें गाति, हो, स्वैर नाम ॥

---

१ बृहदारण्योपनिषद् ४--३

असें " भास्करा " सार्थ हें नाम आहे ।
तुझा अस्त होतां जगा कोण पाहे ? ॥ १ ॥

असे चंद्र सूर्यानुगामी प्रकाशी ॥
निशीं सृष्टिला जो स्वतेजें विकाशी ।
" सुधांशू " असें सार्थ हें नाम ज्यातें ।
असे अस्त, कोण प्रकाशी जगातें ? ॥ २ ॥

पुढें अग्नि येई, प्रकाशी जगाला ।
तयावीण नाहीं गती या कणाला ॥
" बृहद्भानु " आहे खरें नाम ज्याला ।
असे अस्त, कोण प्रकाशी जगाला ? ॥ ३ ॥

पुढें वाणि येई करी कार्य त्याचें ।
दिसेना निशीं होतसे ज्ञान वाचें ॥
पहा " ब्राम्हणी " नाम हें सार्थ आहे ।
असे अस्त, तेव्हां जगा कोण पाहे ? ॥ ४ ॥

असे ज्योतिंचा अस्त साऱ्याहि लोकीं ।
परी आत्म--दीप्ती सदा ही विलोकीं ॥
तिला " सच्चिदानंद नामें अनेक ।
असे भिन्न नामें " परि अर्थ एक ॥ ५ ॥

अवस्थात्रयाला[1] पहाते, रहाते– ।
तिथें नित्य, चित्तीं विचारें पहा, ते ॥

---

1 अवस्थात्रयः—जागृति, स्वप्न, आाण सुषुप्ति

वसे पंचकोशीं[1] मुनी सांगतात ।
परी लिप्त नोहे, असे शुद्ध आंत ॥ ६ ॥

सुषुप्ती असें बीज अज्ञान[2] नाम ।
असे जागृति--स्वप्न हें कार्य--धाम ॥
असें नाम या ज्ञान लोकांत पाहे ।
विवेकें पहातांहि अज्ञान आहे ॥ ७ ॥

जया नाम अज्ञान[2], तें ज्ञान आहे ।
खरी ज्योति ही इंद्रियाऽगम्य राहे ॥
कुराणीं पुराणीं मुनी सांगतात ।
वसे सच्चिदानंद हृद्यंतरांत ॥ ८ ॥

धर्मजागृति डिसेंबर १९१४

---

## संध्याराग-आर्या.

संध्यारागें फुलती सर्व दिशा, रक्तवर्ण या हो होती ।
गाती द्विजमुखगीतें, गुलाल गगनांगणांत उधळीती ॥ १ ॥

वाटे कीं फुलली हो, तापस--हृदयांबुजें नभीं सकल ।
त्यांचा प्रकाश पसरे, ल्याल्या वसनें दिशा अशीं धवल ॥ २ ॥

---

१ पंचकोशः—अन्न, प्राण, मन, विज्ञान ( बुद्धि ) आनंद.

2 The Hindus have anticipated Hegel that German philosopher and have proved that this nothiug ( अज्ञान ) is somthing ( ज्ञान )

*Swami Ramtirth VOL I Part. I P. 68*

किंवा कविची प्रतिभा शृंगारादिकरसें अशी नटली ।
गाउनि मंजुल गाणें कविच्या हृदयांतरांतुनी आली, ॥ ३ ॥

कां निद्रादेवींचें प्रसन्न ऐसें स्वरूप जें असतें ।
तें दाविलें दिशांनीं, सुखमय आहे, जरी न तें दिसतें ॥ ४ ॥

स्वर्गंगेचा आहे ऐसा हा उगम वाटतो मजला ।
तेजोनिधि तारे हे ग्रहमाला वाहती नभीं निशिला ॥ ५ ॥

शुभ्रांशु चंद्र होतो सुधांशुहि तसा कृपा करी कोण ? ।
संध्यादेवी घेई मांडीवर लाल वसन पांघरुण. ॥ ६ ॥

अस्ताला रवि जातां संध्यादेवी स्वतेज हें उघडी ।
भर्ता घरीं नसे जरि साध्वी कांतीस दावि योग्य घडी ॥ ७ ॥

कीं तुकयाची भक्ती आली उदयास, रूप हें घेई ।
बुद्धाची की शांती संध्यारागें फुले अशा समईं ॥ ८ ॥

कीं ज्ञात्याचीं तत्त्वें झालीं हीं प्रकट रागरूपानें ।
संध्याकालीं वाटे दिग्देवी ही खुले न कां त्यानें ? ॥ ९ ॥

कीं दिनरजनीचा हा सांधा सांधावया अशी कांच-- ।
केली देवानें ही लाल, बसविली दिशांमधे साच ॥ १० ॥

किंवा हिरण्यगर्भीं सृष्टी अव्यक्त राहते कैशी ।
घेतें सोज्वलरूपा, दावी दिग्देवता नभीं तैशी ॥ ११ ॥

किंवा नाचे स्वर्गीं आनंदें अप्सरागण, गुलालाला ।
उधळिति तेथें झाल्या प्रेमें दिग्देवता वसन--धवला ॥ १२ ॥

किंवा स्वर्गीं वसती तेजस्वी—देव, तेज दाखविती
संध्यारागें सर्वां, तेणें दिग्देवता अशा नटती ॥ १३ ॥

योद्धे समरीं पडले, स्वर्गीं जे दिव्यरूप कीं झाले।
आले खेळायाला; दिग्देवींनीं तयांस आदरिलें ॥ १४ ॥

राष्ट्रोन्नतिसाठीं कीं केला उद्योग थोर पुरुषांहीं।
स्वर्गीयदेहरूपें रमती दिग्देवतांसवे, पाही। ॥ १५ ॥

रात्रीं नाचति तारे आकाशीं नाट्यरूप घेऊनी।
त्यांची नांदी ऐशी चालविली देवींनीं अशी नटुनी ॥ १६ ॥

किंवा भानू घेतो विश्रांती लावुनी असा पडदा।
त्याच्या सेवेसाठीं सर्व दिशा सोज्वला तयार सदा ॥ १७ ॥

पतिच्या संगें होती रमत दिशा, गर्भतेज हें विलसे।
आली लाली गालीं, संध्यारागें नभांत तीच दिसे ॥ १८ ॥

जीवात्म्याचें आहे तेज कसें, सांगती श्रुती लोकीं।
तें दाखविलें संध्या—रागें, कवि शांतचित्त अवलोकी ॥ १९ ॥

प्रार्थी यवन मशीदिंत, हिंदू देवालयीं जया विनवी।
संध्यारागें प्रगटे ती विभुकांती, जनांस जी निववी ॥ २० ॥

वत्सें हंबरती हो धेनु, गृहा धावुनी, पहा, येती।
द्विजगण विश्रांतीतें ध्याया नीडीं प्रवेश, हो करिती ॥ २१ ॥

गृहिणी—कमल—मुखें तीं संध्यारागें गृहांतरीं खुलती।
बालमुखेंही तैशीं, प्रेमरसानें गुलाब कीं फुलती ॥ २२ ॥

दिनरजनी पति--पत्नी कीं संध्याराग हा तयां जोडी ।
गोडी पाहुनि घ्यावी रसिकें, अज्ञान काय हें निवडी ॥ २३ ॥
जीवात्म्यातें न्यावें परमात्मीं साधुनी अशी संध्या ।
संध्या ऐशी मुनिची, कोण जगीं जाणतो अशी संध्या ॥ २४ ॥
स्वर्वैद्यांनीं केला औषधि--काढा नभांत सांठविला ।
संध्यारागें भरला, दिग्देवींनीं जनांस पाठविला ॥ २५ ॥
ऐशी संध्या फुलते, रसिक हृदय पंकजास जी फुलवी ।
द्रवी प्रेमरसाला, साधुजनालाहि त्यामधें रमवी ॥ २६ ॥

---

## पुष्प-गीत श्लोक.

देइ पुष्प मधु गंध या जनां ।
वायुला करुनिया स्ववाहना ॥
नासिकीं करि निवेश, मोद दे ।
सार्थ हो ‘ सुमन ’ शब्द, जो वदे ॥ १ ॥

सुंदरी धरितसे तुला करीं ।
पाळिते उदरिं केधवां दरी ॥
मंगला तनु मनोहरा सदा ।
नांदते ह्मणुनि देव-संपदा ॥ २ ॥

लाजतो मदन रूप पाहुनी ।
बैसला ह्मणुनि गुप्त जाउनी ॥

३६९

कोमला सुतनु सुंदरा, गळां ।
लेइ त्या अवनि सूत्र--मंगळा ॥ ३ ॥

अंतरीं मधु--रसास तें धरी ।
येइ भानु विकसे तरूवरी ॥
प्राज्ञ--हृद्य--रस वाहतो कसा ।
ज्ञान--सूर्य उगवे, पहा, जसा ॥ ४ ॥

सृष्टि ही कुसुमरूप--भूमिका-- ।
हांसली; सुरस निर्झरोदका-- ॥
प्राज्ञ--मानसलतेस दे कशी ।
जाणतो रसिक मात्र त्याजशी ॥ ५ ॥

तापसी--हृदयवाहिनी निघे-- ।
वाटतें, रविस भेटण्यास, घे-- ॥
पुष्परूप जणुं भूमिका; कवी-- ।
सांगतो, हृदयिं ओळखा रवी. ॥ ६ ॥

राहतो उदरिं गर्भ तो कसा ।
ठेवि ईश्वर फुलांमधे ठसा ॥
गुंगतो भ्रमर, केसरादिक ।
शोधि हें हृदयिं सृष्टिकौतुक. ॥ ७ ॥

वृक्ष ही प्रकृति होय निर्गुण ।
त्यांतुनी निघति काय सद्गुण ! ॥

ईश्वरी कृति किती मनोहर ! ।
दावितेंस, सुमना, निरंतर. ॥ ८ ॥

नांदतें कुसुम वैभवें तरी ।
देवही भजति त्यास अंतरीं ॥
कोण रे, वश तुला फुला नव्हें ।
जीवित क्षण परी टिके न हें ॥ ९ ॥

नवयुग, डिसेंबर १९१४

---

## भाउबिजेची ओवाळणी श्लोक.

ओवाळींतें तुजसि सखया, प्रेमदीपें स्वसा ही ।
या तेजानें चमकति मुखीं देवता सर्व, पाही ॥
नेत्रीं आहे रवि, पवन हा श्रोत्र देशांत वाहे ।
वाणीमध्यें अनल वसतो, देवता--तेज आहे ॥ १ ॥
तेजाला नमितें अनाथ भगिनी, ओवाळितें बांधवा ।
राहो तेज मुखीं, सदैव विलसो, हा पाजळीतें दिवा ॥
द्यावें त्वां सुख देवतांपरि जनां प्रेमस्वरूपें सदा ।
बंधो, देश--समाज--कार्य करणें भोगोनिया आपदा ॥ २ ॥
तेजस्वी नर जे जगांत दिसती शोधोनिया काढणें ।
घालावें भर त्यांत तेज अपलें देशाचिये कारणें ॥
राष्ट्रोद्धार जगांत कार्य पहिलें, हें शिष्टही सांगती ।
व्हावी उन्नति यापरी ह्मणुनिया ओवाळितें आरती ॥ ३ ॥

सृष्टी ही करि भाउबीज विधुला, जो सोम देतो तिला ।
देई सृष्टिस कांति--पुष्टि सरसा ओवाळणी मंगला ॥
येती मेघ घरीं ह्मणून सरिता सप्रेम ओवाळिती ।
तारापुंज सतेज होय गगनीं, ओवाळिते ही क्षिती ॥ ४ ॥

होती वृक्ष सुगंधयुक्त, लतिका ओवाळिती त्यांजला ।
गातो मंजुल--गान पक्षिगण हा स्नेहें मनीं रंगला ॥
प्रेमाश्रु[1] गगनांतुनी तरुवरी स्वर्देवता गाळिती ।
योग्यांचें मन चंद्रिका द्रवविते, वा अंबुजांला किती! ॥ ५ ॥

ओवाळी धरणी गिरींस, धरितो जो द्रव्य नानापरी ।
प्रेमाचा रस पाझरे हळुहळू, ओवाळणी साजरी-- ॥
देई पर्वत कंचुकी हरित, जी त्याली रसा सुंदरी ।
तैसे दे नव--सागरांबर, नद्या घेऊनि जाती घरीं ॥ ६ ॥

वीरांना रणदेवता नमिति या, ओवाळिती आरती ।
त्यांचें धैर्य अगाध, शौर्य तळपे, देशावरी हो रती ॥
आंग्लांचे बहु वीर जर्मन तसे युद्धामधे रंगले ।
धारातीर्थ करून सद्यश नवें ओवाळणी घातलें ॥ ७ ॥

सृष्टीं ऐशी करित असते प्रेमभावें दिवाळी ।
वाटे मातें तुजसि कथिल्या योग्य गोष्टी सुकाळीं ॥
वाया आम्ही, त्यजि न ह्मणुनि स्नेहभावें विचारी ।
आचारानें सरस सण हे पूर्ण व्हावे विचारीं ॥ ८ ॥

नवयुग आक १९१६

---

१ दव.

# कठोपनिषद्-श्लोक.

( उपनिषदें हीं तत्त्वज्ञानाचे ग्रंथ आहेत हे जरि हिंदुधर्मातले ग्रंथ आहेत, तरी प्रत्येक धर्मांतील तत्त्व जाणणारे लोक यांचें परमादरानें सेवन करितात. अशा या ग्रंथांत काय आहे, याची सामान्य कल्पना यावी, म्हणून मराठींत भाषांतर केलें आहे. सहज पाठ व्हावे ह्मणून कवितावद्ध केलें आहे.

प्रत्येक मंत्रांतील प्रत्येक शब्दाचा, अगर वाक्याचा अर्थ यांत येईलच, असें सांगतां येत नाहीं. प्रत्येक मंत्राबद्दल एक श्लोक केलेला आहे व त्या श्लोकांत मंत्राचा सामान्य अर्थ यावा असा हेतु आहे तो कितपत सिद्धीस गेला आहे हें पाहणें जिज्ञासु वाचकांकडे आहे. )

# कठोपनिषद्-श्लोक.

दे द्रव्य वाजश्रवस द्विजांला ।
ठेवोनि आशा मनिं; यज्ञ झाला ॥
सूनू तयाला नचिकेत नांवें-- ।
होता, जयाला हृदयांत गावें ॥ १ ॥

गोदान विप्रांस पिता करी, ती-- ।
श्रद्धा शिरे तों नचिकेत--चित्तीं ॥
चित्तांत शोधी नाचिकेत बाल ।
तें सांगतों मी तुम्हि लक्ष द्याल ॥ २ ॥

" खाण्यापिण्याची वसते न भक्ती ।
ज्या इंद्रियें क्षीण, न दुग्धशक्ती ॥
गाई अशा दान करी द्विजांला ।
दुःखी असा लोक मिळे तयाला " ॥ ३ ॥

जाणोन हें, तो जनकास सांगे ।
कोणा मला द्याल ? तरीच रागें– ॥
बोले विचारेंविण बाप त्याला ।
म्यां अर्पिलें, रे ! तुजला यमाला. ॥ ४ ॥

इच्छेप्रमाणें करितांच सारें ।
आज्ञा पित्याची धरितां सदा, रे ! ॥
मातें यमाला दिधलें कशाला ? ।
कर्तव्य तेणें, न दिसे पित्याला. ॥ ५ ॥

त्या पूर्वजांची स्थिति होति काय ।
वागे कसा सांप्रत साधु–काय ? ॥
धान्यापरी मृत्यु–विनाश सारें ।
या लोकिं, पाहे, दिसती पसारे ॥ ६ ॥

गेला यमाच्या घरिं, तो न तेथें ।
आल्यावरी सांगति, अग्नि, जेथें– ॥
राहे उपाशी अतिथी, शिरे तो ।
पूजा करावी उदकादिकें तों. ॥ ७ ॥

ज्याच्या घरीं ब्राह्मण हो उपाशी ।
त्याचे, पहा, पुत्र--पशू विनाशी ॥
आशा[1]–प्रतीक्षा, प्रियवाणी, याग ।
ऐशा धनाला करि भस्म सांग ॥ ८ ॥

**यमः**—होता उपाशी घरिं रात्रि तीन ।
हे ब्रम्ह, तूं वंद्य, तरी नमीन ॥
प्रार्थीतसें मी, नच ठेविं राग ।
कल्याण हो, तों वर तीन माग. ॥ ९ ॥

**नचिः**—हो शांत--संकल्प पिता सुचित्त ।
जातां घरीं, ओळख पि चित्त– ॥
ठेवो, अशा दे पहिल्या वराला ।
ही प्रार्थना होय तुझ्या पदाला. ॥ १० ॥

**यमः**—होती जशी प्रीति तुझ्यावरील ।
राहील ती, क्रोध न तो वरील ॥
जातां घरीं, पाहिल तो सुखानें ।
माझी कृपा ती तुजला सुखा ने. ॥ ११ ॥

**नचिः**—स्वर्गांमधें भीति नसे कशाची ।
तैशी नसे भीति तिथें यमाची ॥

---

१ अज्ञान पदार्थ ( सोन्याचा पर्वत ) मागणें ( आशा ) ज्ञात पदार्थ मागणें ( प्रतीक्षा )

तो जन्म--मृत्यू तरतो, स्तवी तो-- ।
जाणे तया, शांति खरी वरीतो. ॥ १७ ॥

हो तीनदां कर्म, विधान जाणे ।
जो अग्नि सेवी, मग त्यांत बाणे ॥
तो मृत्यु--पाशा त्याजि याच लोकीं ।
शोका त्यजी, राहिल देव–लोकीं ॥ १८ ॥

हा स्वर्ग्य–वन्ही, वर याचिला जो-- ।
आहे दुजा, नांव तुझेंच साजो– ॥
त्यातें जगीं, माग तिज्या वरातें ।
देतो तरी मी, नचिकेत, त्यातें. ॥ १९ ॥

**नाचिः**----आत्मा असे हो, जरि होय अंत ।
कोणी वदे, तो नच हो जगांत ॥
मी शिष्य आहें, तरि सांग मातें ।
ऐसा तिजा हो वर, दइ यातें ॥ २० ॥

**यमः**—देवां नव्हे ज्ञान कधीं तयाचें ।
आत्मा असे सूक्ष्म, चि धर्म त्याचे ॥
अन्या वरातें तरि माग, बाळा ।
गांजू नको तूं, त्यज या वराला ॥ २१ ॥

**नचिः**---देवा न हो ज्ञान कधीं तयाचें ।
सुज्ञेय नाहीं तरि रूप त्याचें ॥

नाहीं जनां भूक–तहान, धाक ।
आनंद–चित्तें वरितात नाक. ॥ १२ ॥

तो साधनाग्नी शिकलास, बा, रे ! ।
सांगे मला तूं भजकास सारें ।
तो स्वर्ग भक्ता मिळतो, असा हा-- ।
मागें दुजा मी वर, देइं पाहा. ॥ १३ ॥

**यमः**—ज्ञाता असें मी, तुज वन्हि सांगें ।
तद्रूप जाणें–जगतांत वागे– ॥
व्यापोनि सारे, फल देव–लोक– ।
देतो, तसे बुद्धिमधे विलोक. ॥ १४ ॥

**श्रुतिः**—लोकादि वन्ही कथिला तयाला ।
त्या इष्टकांच्या विधिला, स्थलाला ॥
संख्येस; तैसें म्हटलें तयानें ।
संतुष्ट झाला यम तो मनानें ॥ १५ ॥

**यमः**—देई महात्मा वर अन्य त्यातें ।
संतुष्ट होवोनि, ह्मणे तयातें ॥
नांवें तुझ्या हो अनिल प्रसिद्ध ।
पावो तुला तत्फल शास्त्रसिद्ध ॥ १६ ॥

जो तीन वेळा करि भक्ति, शिक्षा ।
मातापित्यांची, गुरुचीहि दीक्षा ॥

तो जन्म--मृत्यू तरतो, स्तवी तो-- ।
जाणे तया, शांति खरी वरीतो. ॥ १७ ॥

हो तीनदां कर्म, विधान जाणे ।
जो अग्नि सेवी, मग त्यांत बाणे ॥
तो मृत्यु--पाशा त्याजि याच लोकीं ।
शोका त्यजी, राहिल देव—लोकीं ॥ १८ ॥

हा स्वर्ग्य—वन्ही, वर याचिला जो– ।
आहे दुजा, नांव तुझेंच साजो– ॥
त्यातें जगीं, माग तिज्या वरातें ।
देतो तरी मी, नचिकेत, त्यातें. ॥ १९ ॥

**नाचि:**----आत्मा असे हो, जरि होय अंत ।
कोणी वदे, तो नच हो जगांत ॥
मी शिष्य आहें, तरि सांग मातें ।
ऐसा तिजा हो वर, दई यातें ॥ २० ॥

**यमः**—देवां नव्हे ज्ञान कधीं तयाचें ।
आत्मा असे सूक्ष्म, चि धर्म त्याचे ॥
अन्या वरातें तरि माग, बाळा ।
गांजू नको तूं, त्यज या वराला ॥ २१ ॥

**नचि:**—देवा न हो ज्ञान कधीं तयाचें ।
सुज्ञेय नाहीं तरि रूप त्याचें ॥

वक्ता जगीं अन्यहि कोण आहे ? ।
नाहीं असा तो वर, तूंच पाहें. ॥ २२ ॥

**यमः**---पुत्रादि होवोत शतायु, माग ।
हत्ती, पशू, द्रव्य, अनेक सांग ॥
तूं राज्य मागें, जितकें असावें ।
आयुष्य देतों, जरि पूर्ण व्हावें ॥ २३ ॥

या सारखा तूं वर माग, बाळा ।
आयुष्य वित्तादिक या धनाला ॥
राज्यास मागें, जरि पूर्ण व्हावें ।
त्वां काम—भोक्ता जगतीं असावें. ॥ २४ ॥

या लोकिं जें दुर्लभ, माग त्यातें ।
रामाऽप्सरादी न मिळे नरांतें ॥
क्रीडा करी यांसह तूंच सारी ।
प्रश्ना न आत्म्याविषयीं विचारी. ॥ २५ ॥

**नचिकेतः**----सर्वेंद्रियांची हरितात कांती-- ।
या वस्तु साऱ्या, टिकती न अंतीं ॥
रामाप्सरागीत नको मला, रे
राहो तुझें तें तुजपाशि सारें ॥ २६ ॥

तृप्ती न दे द्रव्य कधीं नराला ।
इच्छीं जरी मी, मिळवीन त्याला ॥

सत्ता तुझी, तोंवर आयु मातें ।
इच्छी न हें मी, वर तोच यातें. ॥ २७ ॥

आत्मा जरामृत्यु--वियुक्त आहे ।
हा लोक हो अल्प, विनाशि पाहे ।
रामाप्सरांनां नच नित्यता ती ।
त्यांच्यामधें कोण रमेल अंतीं? ॥ २८ ॥

तो प्राण जातां कुडिंतून, राहे-- ।
आत्मा, न राहे, मज सांग कां हें ? ॥
आत्मस्वरूपा मज सांग आतां ।
अन्या वराची नच आस, ताता. ॥ २९ ॥

अध्याय १ ला, वल्ली १ ली.

---

**यमः**----श्रेयप्रियांची जगिं जाण जोडी ।
दोन्ही नरा लाविति भिन्न गोडी ॥
जो श्रेय सेवी, शुभ होय त्याचें ।
आत्मा न जाणे मन तें दुजाचें. ॥ १ ॥

श्रेयप्रियैकत्र जगांत झालें ।
जे धीर ते त्या निवडीत आले ॥
प्रेयाहुनी श्रेय बुधास गोड ।
मूढास वाटे विषयांत कोड. ॥ २ ॥

तो तूं प्रियाचा करुनी विचार ।
त्यातें त्यजिलें, निवडोनि सार ॥
नाहीं प्रियाची तुजलागि गोडी ।
कव्हां प्रियाला नच मूर्ख सोडी ॥ ३ ॥

ज्ञाता मनीं जाणुनि सार, विद्या ।
पाहे, असे भिन्न, तशी अविद्या ॥
विद्येस इच्छी नाचिकेत, पाहे ।
कामादिकांनां न मनांत वाहे. ॥ ४ ॥

मूढ स्वतां पंडित मानितात ।
ते अज्ञ होती पारि या जगांत ॥
ते मूढ होती कुटिलांतरांत ।
अंधास ने अंध जसे पथांत. ॥ ५ ॥

ऐशा मिळेना कधिं देव–लोक ।
उन्मत्त, मूढां नच हा, विलोक ॥
कैसा मिळे त्यां पर–लोक, सांग ।
मृत्यूस होती वश, चित्तिं राग. ॥ ६ ॥

ऐकावयाला न मिळे अनेकां ।
ऐकोन हो ज्ञान न तें कितेकां ॥
वक्ता असे दुर्लभ या जगांत ।
ज्ञाताहि जो सद्गुरु--शिक्षणांत. ॥ ७ ॥

‘आहे’ ‘नसे’ यापरि चिंतिला जो ।
त्या मूढ कैसा कथि? चिंतिं लाजो ॥
आत्म्यांत नाहीं गति चिंतनाची ।
तर्के न हो, सूक्ष्म गती तयाची ॥ ८ ॥

तर्के न हो ज्ञान, पहा, तयाचें ।
वेदांत दे ज्ञान--विचार त्याचें ॥
देई तुला मी मति, सत्य--धीर ।
प्रश्नां कराया न दुजास धीर. ॥ ९ ॥

कर्मा विनाशी मनिं मी विलोकीं ।
नित्या न देईल अनित्य लोकीं? ॥
मी नाचिकेताग्नि यजी, ह्मणून-- ।
स्वर्गांत नामें यम हो ह्मणून ॥ १० ॥

त्या कामपूर्णा, जगदाश्रयाला ।
आनंत्ययज्ञा, ऽभयपार त्याला ॥
स्तुत्यास, विस्तीर्ण--गतीस चिंती ।
आत्म्यास नाहीं स्थल त्याच चित्तीं. ॥ ११ ॥

जाणावया गूढ, मतींत वास ।
आच्छादि सृष्टी, धारि संकटास ॥
त्या जाण, चित्तें मग शुद्ध व्हावें ।
टाकोनि हर्षादि, विभूस गावें. ॥ १२ ॥

ऐकोन आत्मा, मननें भजावा ।
व्हावें निदिध्यासन, सूक्ष्य गावा ॥
तो मोद देई भजतां नरास ।
ऐसा असे तो नाचिकेत--दास ॥ १३ ॥

**नचि:**—धर्माहुनी भिन्न, अधर्म नाहीं ।
कायाहुनी भिन्न, न मूळ, पाहीं ॥
भूताहुनी भिन्न, भविष्य नाहीं ।
आम्हां वदे, जाणसि त्यास, पाहीं. ॥ १४ ॥

**यम:**---ज्या वेद बोले, तप ज्यास सांगे ।
ज्या ब्रम्हचर्यें मुनि नित्य मागे ॥
ऐसें तुला मी पद सांगतों कीं ।
संक्षेपता ॐ इति तें विलोकी ॥ १५ ॥

या अक्षराला ऽ पर तत्त्व जाणे ।
तैसें तयानें पर–तत्त्व बाणे ॥
जाणे पराला, फल तें असावें ।
तैसें दुजाला फल अन्य व्हावें ॥ १६ ॥

सर्वांमधे उत्तम हें उपास्य– ।
लोकीं, तसें हें पर होय, दास्य– ॥
त्याचें करावें, मिळतो तयानें ।
ध्यानापरी लोक, पराऽपरा ने ॥ १७ ॥

आत्मा न जन्मे, मरतो न, पाहे ।
त्या ना दुजापासुनि जन्म आहे ॥
नाहींहि रूपांतर, शाश्वताऽज ।
नासे तनू, नष्ट न आत्मराज ॥ १८ ॥

'आत्म्यास मारील' असें ह्मणेल ।
'मेला तयाला' जरि कां वदेल ॥
दोन्ही न त्याला मनिं जाणतात ।
मारी न कोणा, नच त्यास अंत. ॥ १९ ॥

मोठ्यांत मोठा, लघु तो लघूंत ।
प्राण्यांत राहे परि हृत्तनूत ॥
निष्काम आहे तनु शुद्ध ज्याची ।
टाकोनि शोका जग तत्त्व याची ॥ २० ॥

राहे परी दूर फिरे, निजे तो ।
जातो जगीं, सर्वहि रूप घेतो ॥
देवा, जया हर्ष, न हर्ष आहे ।
माझ्याविना कोण तयास पाहे ॥ २१ ॥

आहे शरीरांत, तनू न त्याला ।
हो नाशवंतीं, न विनाश त्याला ॥
मोठा, तसा व्यापक, जाण त्याला ।
शोकीं न ठेवी कधिं जाणत्याला ॥ २२ ॥

शास्त्रीं नसे ज्ञान कधीं तयाचें ।
बुद्ध्यादिकानें फल हो न त्याचें ॥
ज्याची जशी होय उपसना ती ।
दावी तसें ईश्वर रूप अंतीं. ॥ २३ ॥

पापा त्यजीतो, बहु होय शांत ।
आहे समाधानहि इंद्रियांत ॥
चित्तीं, पहा, शांति विरक्ति आहे ।
तो सन्मतीनें प्रभुपाद पाहे ॥ २४ ॥

हें ब्रम्ह, हें क्षत्रिय दोन पाहे ।
आत्म्यास खाण्यास सुघास आहे ॥
मृत्यू तयाची मग शाक आहे ।
आत्म्यास या मूढ कसाहि पाहे ॥ २५ ॥

प. अ. द्वि. वल्ली.

---

आत्मा, तसा जीव रते फलांत– ।
देहामधे बुद्धि–गुहांतरांत ॥
छाया–प्रकाशापरि भेद त्यांत ।
योगी, गृहस्थ प्रतिपादितात ॥ १ ॥

जो अग्नि आहे यजमान–सेतू ।
तज्ज्ञान–सेवेंत सदा वसे तूं ॥
ब्रह्मास योगी परमाश्रयानें– ।
जाणे, भजे त्या परमाश्रया ने. ॥ २ ॥

आत्मा रथी हो, रथ देह जाण ।
बुद्धीस तूं सारथि चित्तिं आण ॥
जाणे मनालागि लगाम त्याचा ।
ज्या सारथी घेइ करांत साचा. ॥ ३ ॥

या इंद्रियांनां मनिं अश्व आण ।
रूपादिकांनां पथ चित्तिं जाण ॥
आत्मेंद्रियांला, समजे मनाला ।
भोक्ता, कथी प्राज्ञ, विचार ज्याला ॥ ४ ॥

धी–सारथीला न विचार–वित्त ।
ये त्या धराया न लगाम–चित्त ॥
तो इंद्रियाऽश्वांस कसा धरील ! ।
घोडे तयाचे बहु दुष्ट–शील. ॥ ५ ॥

ज्याचा असे सूत विचारवंत ।
ठेवी लगामास–मनास हात ॥
त्या इंद्रियाऽश्वां वश नित्य ठेवी ।
सन्मार्ग त्यातें मग नित्य सेवी. ॥ ६ ॥

जो ना विचारी कधिं मानसीं हो ।
सत्ते न ज्याच्या मन हें धरी, हो ॥
जो हो कधीं शुद्ध न अंतरांत ।
संसारिं जाई, नच तत्पदांत. ॥ ७ ॥

जो हो विचारी बहु अंतरांत ।
ठेवी मनाला अपल्या करांत ॥
तो त्यामुळें होय पवित्र आंत ।
जाई तई नित्य अशा पदांत. ॥ ८ ॥

ज्याचा असे सूत विचार–शुद्ध ।
ज्याचा मनोरूप लगाम शुद्ध ॥
संसार मार्गांतुनि पार जाई ।
तो अंतरीं विष्णुस नित्य गाई. ॥ ९ ॥

या इंद्रियां कारण सूक्ष्म–भूत ।
हें त्याहुनी व्यापक, कार्यभूत ॥
भूताहुनी तें मन, त्याहुनी ती ॥
बुद्धी, महात्मा मति, याच रीती. ॥ १० ॥

आत्मा महान्, त्याहुनि तें, विचार ।
अव्यक्त आहे, मग सृष्टि–सार ॥
त्याहून मोठें परमात्म–रूप ।
त्याहून मोठें जगतीं न रूप. ॥ ११ ॥

हा सर्व–जीवांतर गूढ आहे ।
कोणा कळेना परिपूर्ण बा, हें ॥
ज्याची मती सूक्ष्म–विचार आहे ।
ज्ञानी मनीं नित्य तयास पाहे. ॥ १२ ॥

हा इंद्रियें अर्पि मना विवेकी ।
बुद्धीस देई मन हें तसें कीं ॥
आत्म्यास देई मति जो महात्मा ।
जातो परात्म्यांत मिळोन आत्मा. ॥ १३ ॥

जागा असे, ऊठ, गुरूस शोध ।
त्यांनीं दिलेला मनिं शोध बोध ॥
ती खड्ग--धारा बहु सूक्ष्म आहे-- ।
जाया तसे मार्ग कठीण बा, हे. ॥ १४ ॥

ना शब्द, न स्पर्श, न रूप ज्याला ।
हो नित्य तें, अव्यय, ना रसाला ॥
आदी नसे ज्यास, अनंत शोध ।
घे **सच्चिदानंद** मनांत बोध. ॥ १५ ॥

जें ज्ञान ऐके नचिकेत--योगी ।
जें सांगतो तो यम, नित्य भोगी ॥
ऐके तसें सांगतसे, तयांला ।
हा सच्चिदानंद--विभू मिळाला. ॥ १६ ॥

जो गुह्य हें सांगतसे द्विजाला ।
वा श्राद्ध--कालीं कथितो तयाला ॥
त्या प्राप्त होई फळ मोक्ष--लोक ।
रात्रंदिनीं तूं मनिं हें विलोक. ॥ १७ ॥

अध्या १ ला, वल्ली ३ री

---

या इंद्रियांचें मुख बाह्य केलें ।
शब्दादिकीं तें रत नित्य ठेलें ॥
आत्मा दिसेना, मग धीर कोणी– ।
मोक्षास इच्छी, विषया न आणी. ॥ १ ॥

जे बाह्य--वृत्ती असती, तयां ते-- ।
टाकी अविद्या यम--पाश हातें ॥
जे जाणती धीर विभूस चित्तीं ।
अज्ञानिं मोक्षा न कधीं वरीती. ॥ २ ॥

रूपास, शब्दास, रसास, जाणे ।
स्पर्शास, गंधासहि सत्य बाणे-- ॥
ज्यानें तयावीण जगांत काय ! ।
तो हाच आत्मा विभु, विष्णुकाय ॥ ३ ॥

स्वप्नामधे वृत्ति उठे तयांनां– ।
पाहे, तसे जागरितांत ज्यांना ॥
आत्मा असे तो, विभु जो महात्मा ।
त्या धीर पाहे, हृदयांतरात्मा. ॥ ४ ॥

हा कर्मभोक्ता वसतो समीप ।
आत्मा तसा जीव, न त्यासमीप ॥
कांहीं लपे, भूतभविष्य सारें-- ।
जो चालवी, त्या हृदयीं पहा रे. ॥ ५ ॥

जो पंच भूतांहुनि पूर्वि झाला ।
ब्रम्हांतुनी पूर्वि जगांत आला ॥
जो हृद्गुहेमाजि वसे सभूत ।
त्यातें पहावें मग याच भूंत. ॥ ६ ॥

ब्रम्हांतुनी होय हिरण्यगर्भ ।
शब्दादि भोगी, 'अदिती' सगर्भ ॥
हें नांव लोकीं कथिती तयास ।
हो देव भूतासह हृन्निवास. ॥ ७ ॥

अग्नी वसे लोकिं, तसा मनांत ।
तो,–गर्भिणी पोषिति गर्भ आंत ॥
कर्मी, यती नित्य तसा मनांत ।
ध्यातात, यज्ञीं यजितात शांत. ॥ ८ ॥

प्राणांतुनी सूर्य निघे तसाच ।
अस्तास जाई मग त्यांत साच ॥
हे देव सारे वसती तयांत– ।
अस्तित्व तेणें, प्रभु शोध आंत. ॥ ९ ॥

जें होय लोकीं, हृदयांत राहे ।
जें ह्या हृदीं, तें जगतांत पाहे ॥
जो भिन्न पाहे जगतांत सारे ।
तो जन्म--मृत्यूंत पडे सदा रे. ॥ १० ॥

हें द्वैत जेथें वसतें न, त्यास ।
पाहे मनानें, स्तवि हृन्निवास. ॥
जो भिन्न पाहे जगतांत सारें ।
तो जन्म—मृत्यूंत पडे सदा रे. ॥ ११ ॥

अंगुष्ठ—मात्र प्रभु आंत राहे ।
आत्म्यामधे त्या पुरुषास पाहे ॥
भूता भविष्यावरि होय सत्ता ।
त्यातें लपे काय ! असे नियंता. ॥ १२ ॥

अंगुष्ठ—मात्र प्रभु अंतरांत ।
ज्योतिःस्वरूपी, नच धूर त्यांत ।
भूता भविष्यावरि होय सत्ता ।
जो यापुढें होय जगन्नियंता. ॥ १३ ॥

पाऊस होई जरि उंच देशीं ।
तें पाणि धावे सखल—प्रदेशीं ॥
एणेंपरी धर्म अनेक पाहे ।
तो त्यापरी जन्मविनाश राहे. ॥ १४ ॥

जें शुद्ध पाणी, जल त्यांत शुद्ध ।
टाकीं, तरी शुद्ध, न हो अशुद्ध ॥
जो चिंतनानें वरि आत्मरूप ।
हो सच्चिदानंद विभु—स्वरूप. ॥ १५ ॥

द्वि. अ. प्र. वल्ली.

---

एकादशद्वार[1] जयास, गांव– ।
हा देह आहे, विभुचाच भाव ॥
त्यातें भजे जो, विषय त्यजोनी ।
तो मुक्त आहे जगतीं असोनी. ॥ १ ॥

जातो, वसे स्वर्गीं, जगांत राहे ।
आकाशवासी, ज्वलनोर्वि वाहे ॥
द्रोणीं, वसे तो पुरुषांत देवीं ।
सत्यांत, आकाशींहि, सर्व सेवी. ॥ २ ॥

प्राणास नेई वरती, अपान– ।
खालीं करी जो, प्रभु तोच मान ॥
मध्ये वसे, देव उपासितात– ।
सारे तयाला, भज अंतरांत ॥ ३ ॥

आत्मा असा देह–पुरांत राहे ।
जातां त्यजोनी तनु, काय राहे ! ॥
प्राणेंद्रियें हीं करितात काय ? ।
निर्जीव होती विभुवीण, हाय ! ॥ ४ ॥

प्राणें जगेना मग जीव लोकीं ।
तैसा अपानें, मनिं तूं विलोकीं ॥
त्याहून हो अन्य विभू जगांत ।
ज्या आश्रयें हे जगिं चालतात. ॥ ५ ॥

---

१ २ डोळे, २ कान, २ नाक, १ मुख, १ ब्रह्मरंध्र, २ नाभि.

आतां तुला मी कथितों पुन्हां तें ।
गुह्यास तूं जाण सनातनातें ॥
त्यातें न जाणे जारि मृत्यु–लोकीं ।
जन्मास येई, हृदयीं विलोकीं. ॥ ६ ॥

मेल्यावरी कोणि शरीर घेई ।
योनीस अन्या मग जीव नेई ॥
कोणी धरी स्थावर भाव नीच ।
सत्कर्म दुष्कर्म फल दे करींच. ॥ ७ ॥

हीं इंद्रियें लीन मनांत होती ।
स्वप्नामधे वृत्ति उठे, अहो, ती ॥
प्रेरी तिला ब्रम्ह, तयांत सारे-- ।
आहेत, शुद्धाऽमृत नांव, बा, रे ॥ ८ ॥

अग्नी शिरे हो भुवनांत जैसा ।
तो होय रूप प्रतिरूप, तैसा– ॥
आत्मा शरीरांत वसे, अनेक– ।
तो होय रूप, प्रतिरूप एक. ॥ ९ ॥

वायू शिरे हो भुवनांत जैसा ।
तो हो रूप प्रतिरूप, तैसा-- ॥
आत्मा शरीरांत वसे, अनेक ।
तो होय रूप--प्रतिरूप एक. ॥ १० ॥

हो लोक–चक्षू रवि या जगांत ।
दुःखें, सुखें होति न लिप्त त्यांत ॥
भूतांतरात्मा तरि एक आहे ।
तो लोक–दुःखें नच लिप्त राहे. ॥ ११ ॥

भूतांतरात्मैक, वशी असा हा ।
नाना करी हें जग, त्यास पाहा ॥
जे धीर त्यांतें भजती मनांत ।
त्यांनां असे सौख्य, न ज्यास अंत. ॥ १२ ॥

हो नित्य, चैतन्य--जडीं, विनाशीं ।
नानांमधे एक, फला न नाशी– ॥
कर्मानुसारी, हृदिं त्यास पाहे ।
तो शांतिमध्यें मग नित्य राहे. ॥ १३ ॥

जें दाखवाया न समर्थ आहे ।
होई खरें सौख्य तयांत, पाहे ॥
जाणूं कसें तें सुख, सांग आतां ।
कोण प्रकाशी कथि तो विधाता, ॥ १४ ॥

सूर्येंदु तारा नच त्या प्रकाशी ।
त्या वीज, वन्ही न कधीं विकाशी ॥
त्याच्या प्रकाशें जग सर्व चाले ।
आदित्य–चंद्रादिक सर्व हाले. ॥ १५ ॥

द्वि. अ. द्वि. वल्ली

हें ब्रम्ह हो मूल, भवास वृक्ष ।
स्वर्गादि शाखा, म्हणतात दक्ष ॥
अश्वत्थ हो नाम सनातनातें ।
त्या आश्रयें सर्व, न टाकि त्यातें ॥ १ ॥

ही सर्व सृष्टी हलते जयानें !
चाले तशी केवळ शासनानें ।
स्वामीपरी चालवि नित्य सत्ता ।
त्यातें भजावें हृदिं, मोक्षदाता. ॥ २ ॥

ज्याच्या भयें वन्हि जगांत कांपे ।
वायू फिरे, त्यापरि सूर्य तापे ॥
मृत्यू करी काम जगीं भयानें ।
आपापल्या कामिंहि कोण त्या ने ! ॥ ३ ॥

देहीं वसोनी हृदयांत पाहे ।
आत्मा असा हा इहलोकिं आहे ॥
तो जन्म--मृत्यूंत पडे, न जाणे ।
या लोकिं राहे, धरि नित्य ठाणे ॥ ४ ॥

जें आरशांत प्रतिबिंब पाहे ।
आत्म्यामधे त्यापरि तत्त्व आहे ॥
स्वप्नांत तैसे पितृलोकिं जाणे ।
पाण्यांत, गंधर्विं तम तेज बाणे ॥ ५ ॥

या इंद्रियां कारण पंचभूत ।
हीं भिन्न होती परमात्म–भूत ॥
उत्पन्न हो वृत्ति. लयास जाते ।
ब्रह्मास जाणे बुध, घे न त्यांतें ॥ ६ ॥

या इंद्रियांहून मनास मानी– ।
तूं श्रेष्ठ, त्याहून मतीस वानी ॥
बुद्धीहुनी श्रेष्ठ असे महान ।
अव्यक्त मोठें महतास, मान ॥ ७ ॥

अव्यक्त आहे लघु, आत्मरूप ।
मोठें, तयाचें भज तूं स्वरूप ॥
व्यापी, नसे लिंग, तया भजावें ,
तेणें नरानें अमृतास जावें ॥ ८ ॥

याला नसे रूप, तया न पाहे-- ।
डोळा ह्मणोनी, मति--दृश्य आहे ॥
प्रेरी मनाला, हृदयांत राहे ॥
तच्चिंतनानें अमृतास पाहे ॥ ९ ॥

ज्ञानेंद्रियें हीं स्थिर होति आंत ।
बुद्धी, तसें हें मन होइ शांत ॥
व्यापार कोणी करिती मनांत ।
आत्म्यामधे लीन असे निवांत ॥ १० ॥

हो इंद्रियांची गति शांत योग-- ।
योगी वदे, नित्य तयास भोग ॥
तो मत्त नोहे कधिं अंतरांत ।
गत्यागती पूर्ण वसोत शांत ॥ ११ ॥

वाणीस, बुद्धीस अगम्य आहे ।
डोळा तयाला मग काय पाहे ! ॥
श्रद्धा वरी त्यास, न नास्तिकातें-- ।
तो प्राप्त आहे, नच भक्ति त्यातें ॥ १२ ॥

जाणे मनीं तत्त्व, जगास मूल ।
आत्मा कळे, हो, मग भक्ति--मूल ॥
जाणे तया सौख्य जगांत होतें ।
भो **सच्चिदानंदहि** रूप होतें. ॥ १३ ॥

कामास आहे स्थल या मनांत ।
जेव्हां जळे पूर्णचि अंतरांत ॥
तेव्हां नराला मग मोक्ष हो तो ।
संकल्प भस्मे परमात्म होतो ॥ १४ ॥

जेव्हां मनांतील विकल्प जाई ।
हृद्ग्रंथी हो मुक्त समूळ, धाई ॥
त्यातें मिळे तें परमात्मरूप ।
वेदांत दावी जगिं सत्स्वरूप. ॥ १५ ॥

नाड्या शतैकेक हृदींच होती ।
डोक्यावरी एक असे, अहो, ती ॥
जावें तिनें मोक्षपथास अंती ।
नाड्या दुजा देति जिवा विपत्ती ॥ १६ ॥

अंगुष्ठमात्र प्रतिपादितात-- ।
आत्मा असा हा हृदयांतरांत ॥
मोळांतुनी तंतु तसा स्वदेहीं ।
ध्यावा, असे शुभ्र तसा विदेही ॥ १७ ॥

मृत्यू कथी हें, नाचिकेत जाणे-- ।
विद्या, विधी, कर्म मनांत बाणे ॥
हो मुक्त तेणें, पारि कोणि एक-- ।
विदेस जाणे करुनी विवेक. ॥ १८ ॥

शिष्यास पाळो गुरुलाहिलक्षो ।
तेजस्वि विद्या हृदयास रक्षो ॥
आचार्य--शिष्यांत न भेद ठेवो ।
शांती सदा शांति सुशांति देवो ॥ १९ ॥

**द्वि० अ० समाप्त.**

---

## स्नेहगीत पद.

मनोलतिका फुलली । चित्तवृत्ति उमलली ॥
स्नेहगुणा माझारी-- । प्रेम सुमनें गुंफिलीं भारीं ॥

चुंबिती नरनारी । नांदती घरोघरीं ॥
सुमनरस प्याला– । ध्याया, भ्रमर गुंगाचि झाला ॥
इतुका मोहित झाला । बाहेर पुन्हां नच आला ॥
कठिण मोह हा लोकीं । पाडितसे जन शोकीं ॥
सृष्टी तुज हें वदली । अझुनी कां मति भ्रमली ॥
मनोलतिका. ॥ १ ॥

मासिक मनोरंजन.

---

# सृष्टीचें गणित.

## आर्या.

‘ परिमेय ’ तेंच जाणे--चित्तीं परमेश-- सच्चिदानंद ।
गाई, पाही, शोधी त्यातें, हृत्पंकजीं तदानंद ॥ १ ॥
‘ परिमाण ’ जीव जाणे, परमात्म्याचाच अंश हा आहे ।
जिंकुनि षड्रिपु सारे शोधुनि, चित्तांत देव कीं पाहे ॥ २ ॥
‘ अंका ’ दशेंद्रियें हीं दाविति, परमात्म--रूप भक्तातें ।
एक-.व्यापक सृष्टी, अनंत--रूपें तशींच शून्यातें ॥ ३ ॥
‘ बेरीज ’ हीच गणावी--मांडावे सद्विचार जे चार ॥
स्थान--परत्वें पाहुनि मोजावे अंक, सोड कुविचार ॥ ४ ॥
शांति--क्षमा गुणांतुनि आशा--तृष्णा करी ‘ वजाबाकी ’ ॥
सावध चित्तीं राहे, चुकेल कोठें ? मनीं धरी बा, कीं ॥ ५ ॥

दा. क्र. ३६२४



परमेश्वर--चरणाचा अभ्यास करी सदा " गुणाकार " ॥
परमेश 'गुण्य' जाणे 'गुणक' असे जीव, गाइ साचार ॥ ६ ॥
सोडी धर्म असज्जड 'भाजक' तद्भाज्य **सच्चिदानंद** ॥
सावध--चित्तानें तूं भागावें, गाउनी सदानंद ॥ ७ ॥
प्रकृति विकृति--'घात' असे, त्रिगुण--'त्रैराशिकास' जाणावें ॥
एकाग्र--चित्त व्हावें, व्यस्त सम--'गुणोत्तरास' शोधावें ॥ ८ ॥
कारितो दशेंद्रियांकें शब्द--स्पर्शादि--गणित चित्तांत ॥
लिहितो, पुसितो स्मरतो, नाना--व्यवहार नित्य होतात ॥ ९ ॥
'अंकगणित' सगुण असे, व्यक्त असे त्यास कीं दुजें नांव
अव्यक्त 'बीज--गणितहि' अव्यक्ताचा जगांत हा भाव ॥ १० ॥
आधीं व्यक्त शिकावें, जाणावें हृद्गुहेंत तें सारें ॥
आकार--नाम गुण हे अव्यक्त--विकार जाण तूं बा, रे ॥ ११ ॥
'बिंदु' निर्गुण ह्मणती, तद्रेषा ही सगुण कशी होते ? ॥
दिसतें तैसें नसतें, शास्त्राची युक्ति सत्य का हो, तें ? ॥ १२ ॥
सन्निर्विकार ह्मणती 'बिंदु' कीं 'शून्य' हें तसें आहे ॥
ही तद्विकार सृष्टी 'रेषा' वा 'शून्य--लब्धि' ती पाहे ॥ १३ ॥
गणिताच्या कृत्यांच्या घटना जो पाहतो मनोभावें ॥
घडती, दिसती, असती शास्त्र--विचारें मतींत जाणावें ॥ १४ ॥
सृष्टीच्या गणितांतें करितो जो ठेउनी मनीं भाव ॥
परमेश्वर--चरणाचा लाभ तया, संकटांत घे धाव ॥ १५ ॥

'कीर्तन' मासिक पुस्तक.

# सृष्टीचें व्याकरण.

## आर्या.

त्याला 'अव्यय' ह्मणतीः—विकार ज्यातें नसे कधीं कांहीं ॥
परमेश्वर—रूप असे, शुद्ध—मति--मठांत, त्यास तूं पाहीं ॥ १ ॥

त्याचा प्रत्यय घ्यावा हृत्पंकज--मंदिरांत जावोनी ॥
"प्रत्यय" यातें ह्मणती, सृष्टीनें अर्थ घेइ शोधोनी ॥ २ ॥

आकारादिक—गुण हे जेथें वसतात; "नाम" त्या ह्मणती ॥
सारें जग नाम दिसे, परमेश्वर निर्गुणी, कवी वदती ॥ ३ ॥

जेथें गुणांस पाहति त्यांना "सामान्य--नाम" कीं कथिती ॥
ऐसे गुण न पहातां ठेविति नामें 'विशेष' त्या म्हणती ॥ ४ ॥

केवल गुण जाणाया भक्तींवांचुनि दुजें न साधन तें ॥
त्या 'भाववाचक, असे नाम कथी, सुज्ञ त्यांत पूर्ण रते ॥ ५ ॥

जे जे विशेष कांहीं दिसती गुण त्या 'विशेषण' ह्मणावें ॥
सगुण जगत हें दिसतें, टाकुनि त्या निर्गुणांस कीं गावें ॥ ६ ॥

नामाविण काय दिसे, पाहे जगतांत तूं स्वयें आतां ॥
तें 'सर्वनाम जाणे,' जिकडे तिकडे दिसेल तें गातां ॥ ७ ॥

चाले क्रिया सदा या सृष्टीमध्यें, न तीविणें कांहीं ॥
शोधीं, तत्पद कोठें? 'क्रियापद' असेंच नांव त्या पाहीं ॥ ८ ॥

ोघांनां जोडी जें 'उभयान्वयपद' तयास म्हणतात ॥
कुनि विकार सारे जोडी परमेश्वरास तूं हात ॥ ९ ॥

शब्दानें बोध असे, स्वरूप जाणे मती खरें नाकीं ॥
म्हणतात 'शब्दयोगी कळे न तें इंद्रियादिकांना कीं ॥ १० ॥

होतो प्रयोग ज्यांचा, अर्थ निघे त्यांतुनी कसा? कां? हें
ऐसा विचार करितां खुंटे मति 'केवलप्रयोगी' हें ॥ ११ ॥

'व्याकरण' विकृति ह्मणती सृष्टीची. नित्य चालते पाहे ॥
ही इंद्रियांस दिसते, बुद्धीला गम्य शून्य? विभु आहे! ॥ १२ ॥

'धातु' तयाला ह्मणती जेथुनि साऱ्या क्रिया, गड्या, निघती ॥
प्रत्यय त्यांतें लावुनि क्रियापद--हृदीं रमेश--पद भजती ॥ १३ ॥

सृष्टि—व्याकरणाच्या जाती जाणे जगांत कविराज ॥
परमेश्वर—चरणीं तो रमतो अंतीं, पदां नमूं आज ॥ १४ ॥

'कीर्तन' मासिक पुस्तक.

---

# स्वराज्य श्लोक.

'सूर्य, भ्राजिष्ठोऽहं मनुष्येषु भूयासम् ।'

यजुर्वेद अ. ८ मं. ४०

स्वराज्य--सरितोद्गम--स्थल असे शिवा[1]--कालिका ।
महर्षि[1] टिळकाननें वदति भारतोद्धारका ॥
'स्वराज्य असतें जगीं भरत--भू--निसर्ग स्वयें ।
असा यवन, पारसी, जननिला दुरावूं नये ॥ १ ॥

स्वराज्य--मति--देवता--चरणिं दीप ओवाळितो ।
'चला मजसवे तुम्ही,' **टिळक--बाळ** बोलावितो ॥
स्वराज्य--कृति--भावना भरत-मूर्तिची सांगता ।
स्वतंत्र--पद पावतां जगीं मिळे तिला मान्यता ॥ २ ॥

रसा वसुमती--सती भरत--भू असे सार्थक ॥
सुवर्णमय--भूमिका, नृपति वीर्यशाली शक ॥
अनेक मुनि--तापसी रत परेश--पादीं सदा ।
दरिद्र परि पातलें असुनि भारतीं संपदा. ॥ ३ ॥

स्वभेद हरितो खरें समर--तेज हें आपलें ।
स्ववर्ण मनिं आणुनी जननिला स्वयें त्यागिलें ॥

---

१ महर्षि दादाभाई नौरोजी, कलकत्ता सन १९०६

परां शरण जाहलें स्व--पर--भावना--मुग्धता-- ।
पहाल हृदयीं जरी, कळुनि येइ कीं सत्यता.   ॥ ४ ॥

स्वराज्य मिळवावया करिति यत्न सारे जन ।
मतैक्य पारि होइना वदति ' वर्ण ' कीं ' भोजन ' ॥
खरीं नसति कारणें, उगिच माजतीं कां रणें ।
स्वराज्य--कृति--मंदिरीं भरत--भू--पदां सेवणें   ॥ ५ ॥

कथील इतिहास हा स्वपर--भावना--देवता ।
अलंकृति पुराण हें, निवड त्यांत कीं सत्यता ॥
उगाच अभिमान हा समर--तेज कीं जाळितो ।
' निषेध ' ' सहकारित ' दिसती, योग्य तें जाणतो ॥ ६ ॥

स्वराज्य--रवि बाल--चिद्भरत--मेरुला पाजळी ।
सुमीं सुरस भृंग, गा द्विज--समूह काव्यांजळी ॥
करीं प्रतिकृति करी, सहज होय निःशस्त्र ही ।
स्वराज्य पुरुषांतरीं सरस हो दिवाळी मही   ॥ ७ ॥

तप--द्वितय--जाहलें तरु--लतादि हीं लाविलीं ।
अझून रुजलीं न हीं पुरुष--चित्त--भूमी--तळीं ॥
पतंग उडतो ' दुही ' भरत राष्ट्र दीपावरी ।
विझेल न कधीं परी सरस होय तो अंतरीं   ॥ ८ ॥

---

२ पक्षी, देशाभिमानी.

स्वराज्य रुजवी लता **टिळक वा. महाराष्ट्र** हा ।
मैतक्य फल भोगितो गुजर **बारडोली** पहा ॥
लता सुमन पालवी, सुरस गंध हा कालवी ।
स्वतंत्र–फल–भोग वी, भरत–भू सुखी डोलवी ॥ ९ ॥

स्वतंत्र–शुक–वृत्ति ये मनुज–सिद्ध–कार्यांतरीं ।
नको कनक–पिंजरा भरत--भूस, साम्राज्य ' री ,
स्वराष्ट्र--परिपल्लता--वनविहार--गीता वदे ।
सुरम्य--मधु गीत गा, सुरस--काव्य हे शारदे ॥ १० ॥

काव्य--मंडळ, नासिक.

REFBK-0003695
REFBK-0003695

**समाप्त.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३६९५
ग्रं. क्र.

पद्य-पुष्पहार भाग १ ला. यावरील विद्वानांचे

# अभिप्राय.

१ संदेश २।६।१५...कविता खरे खर वाखाणण्याजोगी आहे, दुसऱ्या भागाची कोणीही रसिक वाट पाहील

२ मराठी शिक्षक फेब्रुवारी १०१५...एकंदरीने ' पद्य-पुष्पहार प्रौढ वाचकांस वाचनीय असून ह्यांतील अध्यात्मासारखे विषय तर मननीयहि आहेत

३ धर्मजागृति नोहेंवर १९१४...कविता सहज केल्यासारखी झाली आहे. 'मातृपितृहद्गत' 'वसंतऋतु, 'वर्णन,' 'राज्यारोहण मंगल,' 'विधवा' 'स्त्रियांची स्थिती या कविता चांगल्या आहेत, पण अध्यात्मविचार' ही कविता उत्कृष्ट आहे.

४ रा. सा. गो. वि. कानिटकर...कविता सुबोध आहेत कांहीं कविता विशेष चांगल्या आहेत.

५ रा. ब. वि. मो. महाजनी...एकंदरींत (कविता) सुबोध आहेत नीतिदृष्ट्या गर्ह्य विचार कोठेंहि नाहींत.

पत्ता:—गजानन गोपाळ जोशी,
पेन्शनर स्कूलमास्तर.
चिटणीस " काव्यमंडळ."
न्यू इंग्लिश स्कूलसमोर, घर नं १०५६.
नासिक सिटी.